**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. नरेश बनारसीदास अगरवाल,
स.नं. ११९, कळस, आळंदीरोड, — अपीलकर्ता
पुणे ४११ ००१५

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अतिरिक्त पुणे महानगरपालिका आयुक्त (विशेष ), — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
उप आयुक्त (जनरल ),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. नरेश बनारसीदास अगरवाल, स.नं. ११९, कळस, आळंदीरोड, पुणे ४११ ००१५ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मौजे कळस येथील सर्व्हे क्र. ११३, प्लॉट क्र. ९ या जागेत आळंदी रस्त्याचे बाजूस जाणा-या दुकानाचे चाळीतील गलिच्छ वस्ती म्हणून सेवा शुल्क घेतात, जेव्हा पहिल्यांदा घेतले तेंव्हाचे व आज रोजीचे व त्यावेळचे अधिका-यांची नावे व हुद्दे याची माहिती

## विवेचन

मौजे कळस येथील स.नं.११३, प्लॉट नं.९ या जागेतील दुकानांचे चाळीतील गलिच्छ वस्ती म्हणून सेवाशुल्क घेतले जाते. हे शुल्क पहिल्यांदा घेतले तेव्हाचे व आज रोजीचे शुल्क भरुन घेणा-या अधिका-यांची नावे व हुद्दे यांची माहिती अपीलकर्ता श्री. नरेश बनारसीदास अगरवाल यांनी जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (जनरल ) यांच्याकडे मागितली होती. मागितलेली माहिती मिळाली नाही व दिलेली माहिती दिशाभूल करणारी व खोटी असल्याच्या कारणावरुन श्री. अगरवाल यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय यांनी नियमानुसार शुल्क भरुन घेऊन १५ दिवसात श्री. अगरवाल यांना माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिका-यांनी अपील मान्य करुन दिला. त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून श्री. अगरवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मूळ अर्जात माहितीच्या कालावधीबाबतची स्पष्टता नाही. मौजे कळस येथील स.नं.११३, प्लॉट नं.९ या जागेतील दुकानांचे गलिच्छ वस्ती म्हणून श्री. कमलेश शेषमल यांनी दि. ४.१०.१९९३ रोजी सेवाशुल्क भरले होते, असे क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय यांनी दि. २२.३.२००६ रोजी जन माहिती अधिका-यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्यावरुन

अपेक्षित माहिती सन १९९३ पासूनची असल्याचे दिसते. संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय व येरवडा क्षेत्रिय कार्यालय ही दोन्ही कार्यालये १९९५ नंतर स्थापन झालेली आहेत, त्यांच्याकडे त्याआधीची माहिती उपलब्ध नसल्याचे दोन्ही कार्यालयांनी कळविल्याचे संगमवाडीच्या क्षेत्रिय अधिका-यांच्या पत्रात म्हटले आहे. सन १९९३ पासून श्री. शाम अगरवाल दरवर्षी सेवाशुल्क भरत आले असून सन २००५ - ०६ मध्ये श्री. शाम अगरवाल यांचे नावे श्री. थडाणी बंधू यांनी ९००/- रुपये सेवाशुल्क भरलेले आहे, अशी माहितीही या पत्रात दिली आहे. संदर्भित भाग हा घोषित झोपडपट्टीमध्ये समाविष्ट नाही, तरीही दुकानांचे सेवाशुल्क कसे भरुन घेतले जाते, असा श्री. अगरवाल यांचा मूळ प्रश्न आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयानुसार १५ दिवसात ही माहिती दिली जाणे आवश्यक होते हे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका श्री. अरुण पाटील व उपायुक्त, समाजकल्याण श्री. अनिल गायकवाड यांनी मान्य केले. माहितीची मागणी करणारा मूळ अर्ज दि. १६.१.२००६ चा असून आयोगापुढील सुनावणीच्या दरम्यानच्या काळात माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे श्री. अगरवाल यांनी स्पष्ट केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिरीष यादव, तसेच माहिती देण्यास जबाबदार असलेले अन्य अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत कोणतीही तत्परता दर्शविलेली नाही, तसेच अपुरी माहिती दिली आहे, हे एकूण घटनाक्रम व कागदपत्रे पाहता स्पष्ट होते. मात्र माहितीची मागणी करण्या-या अर्जातील कालावधीबाबतची संदिग्धता, या माहितीचा विविध कार्यालयांमध्ये घ्यावा लागणारा शोध याचा विचार करता कारवाई म्हणून संबंधित जन माहिती अधिका-यांना प्रतिकात्मक शास्ती लावणे आवश्यक आहे. कार्यालयाचे विभाजन अथवा कागदपत्रांचे हस्तांतरण हा महानगरपालिकेचा अंतर्गत प्रशासकीय भाग आहे, त्यामुळे नागरिकांना हवी असलेली माहिती देण्यात होणारा विलंब समजू शकतो, परंतु माहिती नाकारण्यासाठी वा अपुरी, प्रमाणाबाहेरील विलंबाने देणे समर्थनीय नाही.

उभय बाजूंचे म्हणणे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपीलकर्ता श्री. अगरवाल यांना माहिती त्वरित व नि:शुल्क देऊन तसा पूर्तता अहवाल जन माहिती अधिका-यांनी आयोगाला पाठवावा.

३. अपुरी माहिती देण्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिरीष यादव व तत्कालीन अपिलीय प्राधिका-यांनी माहिती देण्यासाठी त्यांच्या आदेशात उल्लेख केलेले उप आयुक्त (समाजकल्याण), उप आयुक्त (गवनि), व क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी कार्यालय यांना रुपये १५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. या तत्कालीन अधिका-यांकडून ही शास्ती वसूल करुन ती दि. १०.१०.२००७ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अतिरिक्त आयुक्त श्री. अरुण पाटील यांनी करुन तसा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

पुणे
दिनांक :- ३१/८/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. नंदकुमार बाबुराव काळे,
मु.काठापूर, पो.लाखणगाव,
ता. आंबेगाव, जि. पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-११
श्री. मो. भि. जाधव

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव
श्री. एस. जी. सहाणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.२.२००६ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.४.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.५.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.६.२००६ |

| | |
|---|---|
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br><br>कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव यांच्याकडे श्री. घोडेकर, श्री. कचरे व श्री. वडेर या उप अभियंत्याच्या कार्यकक्षेतील केटी वेअर (वसंत बंधारे) आहेत, त्यावरील २००४-०५ व २००५-०६ मधील खर्च, निविदा आदि बाबतची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नंदकुमार बाबुराव काळे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव यांच्याकडे श्री. घोडेकर, श्री. कचरे व श्री. वडेर या उप अभियंत्यांच्या कार्यकक्षेतील वसंत बंधाऱ्यांवरील खर्च, निविदा आदीबाबतची माहिती मागितली होती. शुल्क भरुन घेऊनही ही माहिती मुदतीत मिळाली नाही म्हणून श्री. काळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-११ यांच्याकडे अपील केले. त्यांनी दिलेल्या तोंडी आदेशानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्ण माहिती दिली नाही, तसेच अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाची प्रत अद्यापपर्यंत मिळाली नाही, असे नमूद करुन श्री. काळे यांनी दि. २८.६.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. काळे यांनी मागितलेली माहिती सन २००४-०५, २००५-०६ या कालावधीतील होती त्याच्या एकूण कागदांची संख्या ७००० पर्यंत होणार असल्यामुळे रु. ७५००/- चलनाने कोषागारात भरावे, चलनाची प्रत सादर केल्याशिवाय माहिती संकलित करता येणार नाही, असे उप कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१ नारायणगाव यांनी श्री. काळे यांना दि. ७.३.२००६ रोजी कळविले. दि. २०.४.२००६ रोजी संबंधितांशी चर्चा करुन श्री. काळे यांनी केवळ २००५-०६ या कालावधीची माहिती मिळण्याची मागणी केली व त्यासाठी सुचविण्यात आलेले शुल्क रु. ३५००/- जमा केले. तीस दिवसांच्या कालावधीत ही माहिती दिली जाईल, असे उप कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१ श्री. आर.बी. कोल्हे यांनी त्यांना कळविले. तीस दिवसांची मुदत

उलटून गेल्यानंतरही माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. काळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-११ श्री. मो. भि. जाधव यांच्याकडे दि. १.६.२००६ रोजी अपील केले. श्री. जाधव यांनी दि.८.६.२००६ रोजी त्याची सुनावणी घेतली व खालील प्रमाणे निर्णय दिला :

१. अपीलकार यांना भरलेल्या रकमेची तात्काळ पावती देण्यात यावी.

२. प्राप्त झालेल्या रकमेच्या विहित मूल्याप्रमाणे तात्काळ माहिती देण्यात यावी.

३. अधिनियमाचा सखोल अभ्यास करुन योग्य कार्यवाही करण्याबाबत माहिती अधिकारी यांना तोंडी समज देण्यात आली.

'वरीलप्रमाणे निर्णय घेण्यात आल्यावर अपीलकार यांना भरलेल्या रकमेची पावती, तसेच आवश्यक असलेली संपूर्ण माहिती तात्काळ देण्यात आली. श्री. काळे यांनी आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने आपली आता काही तक्रार नाही असे सांगितले व सदर प्रकरणी माहिती अधिकारी यांचेविरुध्द काही कारवाई न करणेबाबत सहमती दर्शविली,' असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांनी दि. २०.६.२००६ रोजी दिलेल्या निर्णयपत्रात नमूद केले आहे. मात्र आपल्याला आदेशाची प्रत मिळाली नाही व जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अपूर्ण आहे, असे नमूद करुन श्री. काळे यांनी दि. २८.६.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. त्याची सुनावणी दि. १४.६.२००७ रोजी मुक्रर करण्यात आली. त्यावेळी श्री. काळे यांनी लेखी निवेदन पाठविले व 'मागणी केलेली पूर्ण माहिती कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१ यांच्या कार्यालयाकडून मिळाली असून आपली काही तक्रार राहिलेली नाही, त्यामुळे अपील रद्द करावे,' असे कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याच स्वरुपाचे निवेदन आयोगाला सादर केले. दि. ८.६.२००६ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशीच श्री. काळे यांना संपूर्ण माहिती दिल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निवेदनात म्हटले आहे. मात्र त्याला जवळ जवळ एक वर्ष उलटल्यानंतरही अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांपैकी कोणीही राज्य माहिती आयोगाला काहीही कळविले नाही. तसेच दि. ८.६.२००६ रोजी

आपल्याला सर्व माहिती मिळाल्याचे श्री. काळे यांनी आता नमूद केले असले तरी त्यांनी आयोगाकडे दि. २८.६.२००६ रोजी अपील दाखल केले आहे. हा तपशील लक्षात घेता, उभय पक्षांची विधाने, माहितीची मागणी व तिची पूर्तता यांमधील पारदर्शकतेबाबत साशंकता निर्माण होते. त्याबाबत आयोग तीव्र नापसंती नोंदवीत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपीलकर्त्याची तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २३ .८.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. तुषार देविदास झेंडे,
मु.पो. म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, धुळे — उत्तरवादी
श्री. विजय चव्हाण

जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
आझादनगर पोलीस ठाणे, धुळे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.८.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तुषार देविदास झेंडे, मु.पो. म्हसोबाचीवाडी,
ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, धुळे तर्फे प्रतिनिधी
पोलीस उपनिरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, धुळे
श्री. हेमंत पोपटराव कदम

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक, आझादनगर पोलीस ठाणे, धुळे
तर्फे प्रतिनिधी पोलिस हेड कॉन्स्टेबल श्री. डी.आर. सपकाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

१. दि. २४ जुलै २००५ रोजी सुनिल तुकाराम नेरकर यांच्या रॉकेल गोदामावरील छाप्याच्या संदर्भात त्यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार किती व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व कोणकोणते गुन्हे दाखल करण्यात आले आहेत
२. सदर घटनेच्या तपासासाठी / चौकशीसाठी कोणकोणते अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते
३. या छाप्यामध्ये अटक केलेल्या आरोपींच्या जबाबाची नक्कल
४. आरोपी महाजन याने दिलेल्या जबाबामध्ये, अन्न नागरी पुरवठा मंत्री श्री. सुनिल तटकरे व गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे यांच्या आदेशाने अशा धाडी / छापे टाकतो असे सांगितले हे सत्य आहे काय
५. याबाबत अन्न नागरी पुरवठा मंत्री श्री. सुनिल तटकरे व गृहराज्य मंत्री सिद्धराम म्हेत्रे यांच्यावर गुन्हा नोंदविला आहे काय, याची कोणत्या प्रकारे चौकशी करण्यात आलेली आहे
६. संबंधित टोळीकडून कोण कोणता ऐवज जप्त करण्यात आला
७. या धाडीसाठी / छाप्यासाठी वापरलेली क्वालिस गाडी एम-०४-सीबी ३४५ व एमएच-१२ अेएच ५२६४ यावर अनुक्रमे लाल व पिवळा दिवा लावला होता. याबाबत काय कारवाई करण्यात आली
८. या घटनेचा / धाडीचा पुढील तपास कोण करीत आहे

## विवेचन

श्री. सुनिल तुकाराम नेरकर यांच्या रॉकेल गोदामावर दि. २४.७.२००५ रोजी घालण्यात आलेल्या छाप्यासंदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. तुषार देविदास झेंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, आझादनगर पोलीस ठाणे, धुळे यांच्याकडे मागितली होती. या अर्जाचे उत्तर

मिळाले नाही म्हणून श्री. झेंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, धुळे यांच्याकडे अपील केले. त्यानंतर माहिती मिळाली, परंतु अपुरी माहिती दिली व अपिलीय प्राधिका-यांनी विलंबाबद्दल जन माहिती अधिका-यांना दंड केला नाही या कारणावरुन श्री. झेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

'धुळे शहर व आझादनगर पोलीस स्टेशन हद्दीत मुस्लिम समाजातील दोन गटात परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले आहेत. मुस्लिम समाजात तीव्र संघर्ष निर्माण झालेला असुन दोन्ही गटात कोणत्याही क्षणी वाद ऊफाळून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचा संभव असल्याने आम्हास मुख्यालयात हजर राहणे अत्यंत गरजेचे आहे,' असे श्री. विजय चव्हाण, पोलीस अधीक्षक, धुळे यांनी आयोगाला दि. ७.८.२००७ रोजीच्या सुनावणीसंदर्भात कळविले . याच कारणास्तव जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, आझादनगर पोलीस ठाणे हेही अनुपस्थित होते. अपवादात्मक परिस्थिती म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या अनुपस्थितीत तुलनेने अत्यंत कनिष्ठ असलेल्या प्रतिनिधींची उपस्थिती मान्य करण्यात आली.

आपल्याला ६८ दिवसांनी व प्रथम अपील केल्यानंतर माहिती मिळाल्याचे श्री. झेंडे यांनी म्हटले आहे. त्यांच्या मूळ अर्जावर दि. ३.१.२००६ अशी तारीख आहे, परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक श्री. अे.एस. इंगळे यांना दि. ३.३.२००६ रोजी अर्ज मिळाल्याचे पोलीस निरीक्षक श्री. एस.एम. राजपुत यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. आपण रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठविला होता. तो आझादनगर पोलिस ठाण्यात स्वीकारला नाही, म्हणून आपण दूरध्वनीवरुन संबंधित पोलीस निरीक्षक यांचेशी संपर्क साधला. त्यांनी सांगितल्यावरुन पुन्हा अर्ज पाठविला, असे श्री. झेंडे यांनी स्पष्ट केले. अर्ज नाकारण्याची जनमाहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक ए.एस.इंगळे यांची कृती योग्य नाही. श्री. झेंडे यांचा अर्ज दि. ३.३.२००६ रोजी जन माहिती अधिका-यांना मिळाल्याचे कागदपत्रावरुन दिसते.जन माहिती अधिकऱ्यांनी त्यांना दि. ११.३.२००६ रोजी उत्तर पाठविले व काही माहिती दिली. त्याचबरोबर 'गुन्हयाचा पुढील तपास अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बरगडे, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे असल्याने उर्वरित माहिती त्यांच्याकडून घ्यावी,' असे त्यांनी, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक श्री. विजय चव्हाण यांनी श्री. झेंडे यांना कळविले. वस्तुतः या माहितीसाठी श्री. झेंडे यांचा अर्ज जन माहिती

अधिका-यांनी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे पाठवावयास हवा होता, त्यांनी तो पाठविला नाही. तसेच श्री. झेंडे यांनीही त्या कार्यालयाकडे अर्ज केला नाही. त्यामुळे आपल्याला अद्यापही मुद्दा क्र.७ ची सर्व माहिती (लाल व पिवळा दिवा लावलेल्या गाडयांबाबतची कारवाई ) व जबाबाच्या प्रती मिळालेल्या नाहीत, असे श्री. झेंडे यांनी नमूद केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अन्य कार्यालयाकडे माहिती मागणीचा अर्ज पाठविण्याबाबतची तरतूद आदि विषयाबाबत संबंधित पोलीस अधिका-यांना माहिती नसल्याचे सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले. माहितीचा अधिकार कायद्याबाबतचे प्रशिक्षण धुळे जिल्ह्यातील पोलीस कर्मचा-यांना दिले गेलेले नाही, असे उपस्थित पोलीस प्रतिनिधींनी आपल्या निवेदनात नमूद केले.

अप्पर पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडून ही माहिती मिळवून अ तपासानंतर त्यांनी पाठविलेल्या अहवालाच्या आधारे उर्वरित माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

वरील बाबी लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याला उर्वरित माहिती दि. १८.८.२००७ पूर्वी द्यावी. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, धुळे यांची ही जबाबदारी राहील.

३. धुळे जिल्ह्यातील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना माहितीचा अधिकार कायद्या प्रशिक्षण देणारी कार्यशाळा पोलीस अधीक्षक, धुळे यांनी आयोजित करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. १०.८.२००७**

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. शशीकांत नारायण वसगडेकर,
अमित अपार्टमेंट, सांभारे रोड,
गावभाग, सांगली- ४१६ ४१६ — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली — उत्तरवादी
श्री. व्ही. एन. परदेशी

जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी, सांगली
श्री. डी. एम. खैरमोडे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/५/२००७ |
| ३ | उपस्थित<br><br>**अपीलकर्ता** श्री. शशीकांत नारायण वसगडेकर, अमित अपार्टमेंट, सांभारे रोड, गावभाग, सांगली- ४१६ ४१६<br><br>**जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली** श्री. डी. एम. खैरमोडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

'तत्कालीन नगर भूमापन अधिकारी, सांगली यांनी दि. ४.६.१९९८ रोजी गावठाण सि.स. क्र. ४९८, ४९८/१, ४९८/२, ४९८/३ब व ५०० या मिळकतीमध्ये समक्ष जाऊन जागेवरील सद्यस्थितीप्रमाणे मिळकतींची मोजमापे घेऊन अर्जदार, जाबदार यांचे जाबजबाब नोंदवून चौकशीचे काम पूर्ण केले' असा उल्लेख नगर भूमापन अधिका-यांच्या दि. ३०.९.१९९८ च्या आदेशात आहे. या मोजणीचे वेळी त्या मिळकतीत राहणारे श्री. देशपांडे (जोशी ), श्री. पाटील, श्री. देसाई व श्री. कुलकर्णी या प्रत्येकाचे ते रहात असलेल्या जागेचे क्षेत्रफळ किती याचा लेखी खुलासा आणि मोजणीच्या नकाशाची प्रत

## विवेचन

सांगली शहर, गावभाग येथील सि.स. क्रं. ४९८, ४९८/१, ४९८/२, ४९८/३ब व ५०० या मिळकतींची मोजमापे व त्याचा नकाशा ही माहिती अपीलकर्ता श्री. शशिकांत नारायण वसगडेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली यांच्याकडे मागितली होती. या मिळकतीत राहणारे श्री. देशपांडे (जोशी), श्री. पाटील, श्री. देसाई व श्री. कुलकर्णी या चौघांच्या जागेचे प्रत्येकी क्षेत्रफळ किती याची माहिती मिळावी, तसेच त्यावेळी तयार केलेल्या मोजणीच्या नकाशाची प्र मिळावी, अशी ही मागणी होती. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली श्री. डी.एम. खैरमोडे यांनी 'ही माहिती देता येत नाही' असे त्यांना कळविले. तत्कालीन नगर भूमापन अधिकारी, सांगली यांनी दि. ४.६.१९९८ रोजी समक्ष जागेवर जाऊन मोजमापे घेऊन अर्जदार व जाबदार यांचे जाबजबाब नोंदविले आहेत. या कामी कोणत्याही प्रकारचा नकाशा तयार करुन क्षेत्र कायम केले नाही, असे श्री. खैरमोडे यांनी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. याविरुध्द श्री. वसगडेकर यांनी अपिलीय प्राधिकारी तसेच अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली श्री. व्ही.एन. परदेशी यांच्याकडे अपील केले. याच विषयाच्या संदर्भात श्री. वसगडेकर यांनी श्री. परदेशी यांच्याकडे केलेल्या अन्य अपिलावर दि. १५.६.२००२ रोजी श्री. परदेशी यांनी दिलेल्या निकालात, 'अपिलकार यांनी शहर

सांगली, येथील गांवभाग सि.स.नं. ४९८, ४९८/१, ४९८/२, ४९८/३ब व ५०० या मिळकतीसंबंधी नियमानुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन मोजणी फी भरुन मोजणीसाठी अर्ज दिल्यास शासकीय माहिती अधिकारी यांनी अग्रक्रमाने प्राधान्य देऊन मोजणी करुन मोजणी नकाशा व क्षेत्र कायम करणेत यावे,' असे आदेश दिले आहेत. दि. ५.४.२००६ रोजी केलेल्या अपिलावरील निर्णय श्री. परदेशी यांनी दि. २५.५.२००६ रोजी देऊन त्यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. वसगडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.६.२००६ रोजी अपील दाखल केले आहे.

श्री. वसगडेकर यांच्या अपिलाची सुनावणी दि. २१.३.२००७ रोजी करण्यात आली. त्यावेळी श्री. वसगडेकर व श्री. खैरमोडे उपस्थित होते. श्री. वसगडेकर यांनी मागितलेली माहिती तोपर्यंत त्यांना दिली गेलेली नव्हती. त्यांचा मूळ अर्ज दि. ६.३.२००६ चा आहे. म्हणजेच जवळ जवळ वर्ष झाले तरी त्यांना माहिती दिली गेलेली नाही, असे स्पष्ट झाले. संबंधित जागेची मोजणी करुन मोजणी नकाशा व क्षेत्र कायम करण्याचा श्री. परदेशी यांनी दि. १५.६.२००६ रोजी दिलेला आदेश माहितीचा अधिकार अधिनियम कायद्याअंतर्गत तरतुदींपेक्षा प्रशासकीय स्वरुपाचा होता. परंतु मोजणी नकाशा व क्षेत्र यांच्याशी तो संबंधित असल्यामुळे त्याची कार्यवाही होऊन माहिती दिली जाणे आवश्यक होते, तशी ती दिली गेलेली नाही. दि. २५.५.२००६ रोजी श्री. वसगडेकर यांच्या अपिलावर दिलेल्या निर्णयात 'सदरची माहिती दि. ४.४.२००६ पर्यंत देण्याची असताना माहिती अधिका-यांनी दि. ५.४.२००६ रोजी दिली आहे. म्हणजेच माहिती पुरविण्यास एक दिवस विलंब झाल्याचे दिसून येते,' असे श्री. परदेशी यांनी म्हटले आहे. मात्र 'छाननीअंती अर्जदारास माहिती देणे वाजवी' असल्याचे नमूद करुन त्यांनी हा विलंब रास्त मानला आहे, इतकेच नव्हे, तर 'अपीलदार यांनी मागणी केलेली माहिती छाननीअंती अचूक अशी देणे वाजवी असलेने, शासकीय माहिती अधिकारी यांना माहिती तयार करणेस विलंब झालेचे दिसून येते. अपीलदार यांनी मागणी केलेली माहिती अपीलदार हे शासकीय माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. ३.४.२००६ रोजी अन्य नकला मागणी करणेसाठी उपस्थित असताना, परिरक्षण भूमापक क्र.२ सांगली यांनी तयार करुन ठेवलेली माहिती अनावधानाने देणेची राहून गेलेबाबत शासकीय माहिती अधिकारी यांनी इकडे समक्ष सांगितले,' असेही श्री. परदेशी यांनी निर्णय पत्रात नमूद केले आहे. श्री. वसगडेकर यांना अपेक्षित असलेली माहिती दिली, असा अभास त्यातून निर्माण होतो.

परंतु प्रत्यक्षात नगर भूमापन अधिकारी श्री. खैरमोडे यांनी दि. ३.४.२००६ रोजी श्री. वसगडेकर यांना पाठविलेल्या पत्रात 'माहिती देता येत नसल्याचे' कळविले आहे. माहिती देण्यास टाळाटाळ व त्याबाबत दिशाभूल करण्याचा प्रयत्न हेच त्यातून दिसून येते. याची दाखल घेऊन आयोगाने दि. २१.३.२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी, 'जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी श्री. डी.एम. खैरमोडे यांनी दि. ३०.३.२००७ पर्यंत श्री. वसगडेकर यांना संबंधित माहिती व नकाशासाठी विहित केलेले शुल्क आकारुन मोजणी नकाशाची प्रमाणित प्रत द्यावी,' असा आदेश दिला. त्याबाबतचा पूर्तता अहवाल श्री. खैरमोडे यांनी पाठविला नाही. तसेच दि. ३१.३.२००७ रोजी श्री. वसगडेकर यांना एक नकाशा दिला, परंतु दि. ४.६.१९९८ रोजी तत्कालीन नगर भूमापन अधिका-यांनी घेतलेली मोजमापे व संबंधित चौघांकडील एकूण / प्रत्येकी क्षेत्र याची माहिती व नकाशा न देता श्री. देशपांडे (जोशी), श्री. पाटील, श्री. देसाई व श्री. कुलकर्णी यांच्या कब्जेवहिवाटीला असलेल्या जागेचा नकाशा देऊन त्या क्षेत्राची माहिती कळविली. ( श्री. देशपांडे (जोशी), श्री. पाटील, श्री. देसाई व श्री. कुलकर्णी या चारही व्यक्ती सरकारच्या भूमि अभिलेख विभागात पूर्वी सेवेत होत्या. )

आपण मागितलेली माहिती मिळाली नसून अयोग्य माहिती दिली गेली आहे, असे श्री. वसगडेकर यांनी श्री. खैरमोडे यांना वारंवार सांगूनही त्यांनी त्याची दखल घेतली नाही. याबाबत श्री. वसगडेकर यांनी आयोगाकडे केलेल्या तक्रारीची दखल घेऊन दि. ३०.५.२००७ रोजी पुन्हा सुनावणी निश्चित करण्यात आली. अद्यापही आपल्याला माहिती मिळाली नसल्याचे दि. २७.५.२००७ रोजी श्री. वसगडेकर यांनी लेखी निवेदनाद्वारे कळविले. श्री. खैरमोडे यांनी संबंधित माहितीबाबत श्री. वसगडेकर यांच्याशी झालेल्या चर्चेचा उल्लेख केला. उपलब्ध सर्व माहिती व संबंधित नकाशा आपण दिला असल्याचे त्यांनी नमूद केले, तसेच श्री. वसगडेकर यांचा तपशिलाबाबत गैरसमज झाला असून त्यांच्याशी चर्चा करुन आवश्यक ती पूर्तता आपण करु, असे निवेदन श्री. खैरमोडे यांनी केले.

श्री. वसगडेकर माहितीबाबतची नेमक्या स्वरुपाची मागणी सातत्याने करीत असून वर्षभराचा कालावधी उलटून गेल्यानंतरही त्यांना नेमकी माहिती दिली गेलेली नाही. अपीलकर्त्याच्या मागणीची योग्य ती दखल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी घेतलेली नाही. माहिती देण्यास टाळाटाळ करण्याच्या जन माहिती अधिका-याच्या भूमिकेला पाठीशी घालणारा अपिलीय प्राधिकारी श्री. परदेशी यांचा निकाल आहे. 'माहिती देणेची अनावधानाने राहून गेली,' अशासारखी हास्यास्पद सबब

त्यांनी अप्रत्यक्षरीत्या ग्राह्य मानणे हे त्याचेच निदर्शक आहे. त्यांची ही भूमिका न्याय्य व नि:पक्ष नाही. दि. ४.६.१९९८ रोजी तत्कालीन नगर भूमापन अधिका-यांनी जागेवरील सद्यस्थितीप्रमाणे घेतलेल्या मोजमापानुसार नकाशा तयार केला नाही, असे प्रतिपादन नगर भूमापन अधिकारी व अपिलीय प्राधिका-यांनी सातत्याने केले आहे.

वरील पार्श्वभूमी व उभय बाजूंची निवेदने आणि सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती दि. २०.८.२००७ पर्यंत जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली यांनी द्यावी. दि. ४.६.१९९८ रोजी केलेल्या मोजणीनुसार नकाशा तयार झ ाला नसल्यास जो नकाशा उपलब्ध आहे तो प्रमाणित करुन; शुल्क न आकारता अपीलकर्त्यास द्यावा. त्याचबरोबर त्यावेळी केलेल्या मोजणीचा संपूर्ण व नेमका तपशील अपीलकर्त्याला द्यावा.

३. जन माहिती अधिका-यांनी अपुरी व चुकीची माहिती दिल्यामुळे, अपीलकर्त्याला झालेला मन:स्ताप लक्षात घेऊन प्रतिकात्मक भरपाई म्हणून जन माहिती अधिकारी श्री. खैरमोडे यांनी श्री. वसगडेकर यांना रु. ५०००/- अदा करावेत. दि. ५.९.२००७ पर्यंत त्याची पूर्तता करुन आयोगाला अहवाल पाठवावा. ही भरपाई श्री. खैरमोडे यांनी व्यक्तिशः करावयाची आहे.

४. अपिलीय प्राधिकारी श्री. व्ही. एन. परदेशी यांच्या अपील - हाताळणीबाबत आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत असून त्याना समज देण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ८.८.२००७